# क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सह. साखर कारखाना, कुंडल

## औद्योगिक क्षेत्र भेट

क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय कुंडलमधील वाणिज्य विभागाच्या वतीने शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ रोजी एक दिवसीय औद्योगिक क्षेत्र भेटीचे आयोजन क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सह. साखर कारखाना, कुंडल आणि क्रांती स्मारक येथे करण्यात आले.

या क्षेत्र भेटीचा मुख्य उद्देश वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांना क्रांती सह. साखर कारखान्याचा इतिहास, साखर कारखान्यामधील ऊसापासून साखर तयार होण्याची प्रक्रिया समजावून घेणे आणि साखरेबारोबरच तयार होणारी इतर उत्पादने यांची माहिती घेणे. तसेच कुंडल्मधील थोर क्रांतिकारक स्व. क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पवित्र स्मारकांना भेट देणे हा होता.

सर्वप्रथम क्रांती सह. साखर कारखान्याचे लेबर ऑफीसर श्री. विरेंद्र देशमुख यांनी क्रांती कारखान्याचा इतिहास, या कारखान्याचे 'क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड' असे झालेले नामांतरण, सभासद संख्या, कारखान्याची सुरुवातीची गाळप क्षमता व सध्याची गाळप क्षमता याची माहिती दिली. त्याचप्रमाणे इथेनॉल, सहवीज प्रकल्प आणि डिस्लरी प्रकल्प यांची सविस्तर माहिती दिली.

त्यानंतर उसाच्या गवाणीपासून ते साखर तयार होणाऱ्या प्रक्रीयेपर्यंतची संपूर्ण माहिती तेथील उपस्थित असणाऱ्या वेगवेगळ्या कर्मचार्यांनी दिली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी उसाच्या रसाचा आस्वाद देखील घेतला.

या क्षेत्र भेटी दरम्यान गांधी एज्युकेशन सोसायटी, कुंडलच्या समन्वय समितीचे अध्यक्ष व कारखान्याचे मार्गदर्शक मा. श्री. किरण (तात्या) लाड यांची भेट घेतली. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध दैनंदिन उदाहरणांच्या आधारे मार्गदर्शन केले. त्यामध्ये महिलांची आपल्या घराप्रती आणि संसाराप्रती असणारी चिकाटी तसेच कॉमर्स शाखेच्या विद्यार्थ्यांकडून असणाऱ्या अपेक्षा याची माहिती दिली.

त्यानंतर स्व. क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या स्मृती स्थळाला भेट दिली आणि त्या ठिकाणी असणाऱ्या 'क्रांतीअग्रणी जीवनदर्शन'ला देखील भेट दिली. यामध्ये क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांचा संपूर्ण जीवनपट चित्र स्वरुपात मांडण्यात आला आहे.

शेवटी क्रांतिसिंह नाना पाटील आणि क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या पवित्र स्मारकांना वंदन करून या औद्योगिक क्षेत्र भेटीची सांगता करण्यात आली.

या औद्योगिक क्षेत्र भेटीमध्ये वाणिज्य विभागप्रमुख डॉ. पी. बी. लुपणे, सहा. प्रधापिका कु. ए. बी. जाधव व कु. प्रतिभा सावत यांच्याबरोबरच वाणिज्य विभागातील २१ विद्यार्थीनी व ०७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय कुंडलमधील वाणिज्य विभागाच्या वतीने शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ रोजी एक दिवसीय औद्योगिक क्षेत्र भेटीचे आयोजन क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सह. साखर कारखाना, कुंडल येथे करण्यात आले.







क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सह. साखर कारखान्याचे लेबर ऑफीसर श्री. विरेंद्र देशमुख माहिती देताना ...



गांधी एज्युकेशन सोसायटी, कुंडलच्या समन्वय समितीचे अध्यक्ष व कारखान्याचे मार्गदर्शक मा. श्री. किरण (तात्या) लाड यांची भेट...




स्व. क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या स्मृती स्थळाला भेट...





क्रांतिसिंह नाना पाटील स्मारक भेट...



क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड स्मारक भेट...

